# “महिलांवरील अत्याचारा संदर्भात” दाखल झालेल्या गुन्हयांची माहिती

## दि. ०७.०५.२०१७

| गुन्हे प्रकार | पो स्टे गु.र.नं.क | गु.घ.ता. वे. ठि. | गुन्हयाची हकीगत | तपास |
|---|---|---|---|---|
| | | | **विनयभंग** | |
| **स्त्री अत्याचार** | **निगडी २४५/१७ ३५४, ३५४ब, ३२३, ५०४, ५०६** | **दि.६/५/१७ रो २३.०० वा** | फिर्यादी ची बहिणीचा मुलगा यास गाडी लावण्याचे कारणावरुन भांडणे काढुन चिडुन फिर्यादी चे पती, मुलगा व बहिणीचा मुलगा यांना वाईट शिव्या देवुन काठीने, हाताने लाथाने मारहाण केली. तेव्हा फिर्यादी हे भांडणामध्ये गेले असताना आरोपी क्र. १ यांने फिर्यादी याचे डोकाचे केस पकडुन खाली पाडुन छाती दाबली व आरोपी क्र.२ याने फिर्यादीचे छाती पकडुन अंगातील गाऊन जोरात ओढुन फाडुन टाकला व त्यांना म्हणाला की, तुझी नागडी धींड काढुन धंद्यावर बसवीन असे अर्वाच्च भाषेत बोलून शिवीगाळ केली. फिर्यादी चे मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करुन त्यांचा विनयभंग केला. | सपोनि सोनावणे |
| | **मुंढवा १३३/१७ ३५४, ५०४, ५०६ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध अधि क ८,१२** | **दि. ६/५/१७ रो २०.३०** | आरोपी हा नेहमी फिर्यादी यांना शाळेत जाता येता त्रास देत असुन फिर्यादी यांनी दुकानातुन खारीचे पाकीट घेतले व त्या दुकानदाराला पैसे दत असताना आरोपी हा त्याच्या हातात असलेले खजरुचे पाकीट घेवुन फिर्यादीचे समोर आला व त्यातील खजरु काढुन ती फिर्यादी यांना खा खा अशी जबरदस्ती करु लागला यातील फिर्यादी यांनी नकार दिला असता आरोपी ने फिर्यादी चा हात पकडला व त्यांच्या तोंडात खजरु घालण्याचा प्रयत्न करु लागला व फिर्यादी यांना म्हणाला की, “माझे बरोबर चल, तुला शॉट दतो, तुझेमध्ये घसवतो, तुला मला येईल” त्यामुळे फिर्यादी यांनी घाबरुन त्याचा हात झटकुन घरी पळत गेल्या व फिर्यादी यांची आई घरी आल्यावर घडलेला प्रकार सांगितला असता त्यांनी आरोपी ची आईला समजावुन सांगण्यसाठी गेली असता आरोपी ची बहिण व आई यांनी फिर्यादी यांचे आईलाच दमदाटी करुन शिवीगाळ केली. | सपोनि खेडेकर |

Pune Police

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | समर्थ ९५/१७ ३५४ (ड)(२) IT ACT ६७ | ऑक्टोबर २०१६ ते दि. ६/५/१७ रो | फिर्यादी यांचे मोबाईलवर आरोपी यांचे मोबाईलवरुन कल व अश्लिल मेसेज पाठविली तसेच पतीस मारुन टाकण्याची धमकी आरोपी याने फिर्यादी ला दिली आहे. | मपोउपनि संत |
| | | | **अपहरण** | |
| | खडकी ११२/१७ ३६३ | दि.७/५/१७ रो१५.०० ते १८.०० | फिर्यादी यांची मुलगी हीस आरोपी याने कशाची तरी फूस लावुन कोठेतरी पळुन नेले. | मपोउपनि कांबळे |
| | वाकड २८५/१७ ६३६ | दि. ६/५/१७ रो ०८.४५ वा | फिर्यादी ची मुलगी हिस कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणसाठी तिस फुस लावुन पळवुन नेले आहे. | पोउपनि आहेर |
| | | | **कौटुंबिक हिंसाचार** | |
| | बिबवेवाडी १४३/१७ ४०६, ४९८अ, ३२३, ५०४, ५०६, ३४ | जाने २०१५ ते आजपवेतो | फिर्यादी यांना त्यांचे आईकडून पैसे घेवून ये असे वारंवार म्हणून 'तुला मुल बाळ होत नाही, तू वांझोटी आहेस, तू काय कामाची आहेस' असे वारंवार म्हणून फिर्यादीस शिवीगाळ करून हाताने मारहाण करून धमकी दिली आहे. तसेच जानेवारी २०१६ मध्ये फिर्यादी हया त्यांचे आईचे घरी राहत असताना तेथे आरोपी हे येवून म्हणाले की, 'मी तुला नांदायला घेवून जातो पण मला पैशाची अडचण आहे तुझ्या जवळील आईने दिलेला राणीहार मला दे मी तो गहाण ठेवून त्याचे आलेले पैसे आपल्या संसारात लावून आपण दोघे एकत्र आनंदात राहून संसार करु' असे गोड गोड बोलून फिर्यादी चा विश्वास संपादन करुन त्यांनी संसार करण्याची आशा दाखवून त्यांचे जवळील त्यांच्या आइने लग्नात दिलेला साडेसहा तोळयाचा चार पदरी सोन्याचा राणीहार त्यांच्याकडून घेवून त्याचा अपहार केला आहे. | मपोउपनि सुतार |